पुढारी

# इतिहासाबद्दल आस्था निर्माण करणे सर्वांची जबाबदारी

## कुमार केतकर : 'महान शिवाजी' शिवचरित्राचे प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आज द्वेषामुळे इतिहासाकडे दुर्लक्ष होत असल्याने याच्या संबंधित अभ्यासक-संशोधक यांची उपेक्षा झाली आहे. विद्यार्थ्यांसह समाजामध्ये इतिहासाबद्दल आस्था निर्माण करत नाही तोपर्यंत ही उपेक्षा कायम राहणार आहे. हे चित्र बदलण्यासाठी इतिहासाच्या शिक्षणाचा प्रचार-प्रसार करणं ही आपली सर्वांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन खा. कुमार केतकर यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'महान शिवाजी' महाग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ संपादक व खासदार कुमार केतकर व शाहू महाराज यांच्या हस्ते झाले. डावीकडून डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व वसंत आपटे.**

शिवाजी विद्यापीठ शाहू संशोधन केंद्राच्या वतीने डॉ. बाळकृष्ण लिखित 'शिवाजी द ग्रेट' या चार खंडांच्या शिवचरित्राचा मराठी अनुवाद 'महान शिवाजी' या नावाने करण्यात आला आहे. याचे संपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले असून अनुवादक वसंत आपटे आहेत. या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ राजर्षी शाहू सभागृहात शाहू महाराज यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

केतकर म्हणाले, इतिहासाच्या अभ्यासासाठी देशात पोषक वातावरण निर्माण होणे आवश्यक असून, त्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. 'महान शिवाजी' हा मूळ ग्रंथ ज्यांनी लिहिला, त्या डॉ. बाळकृष्ण यांचे मूळ मुलतान आहे, जे सध्याच्या पाकिस्तानात आहे. पण, ते पाकिस्तानात आहे म्हणून त्या ठिकाणाचा द्वेष करण्याचे कारण नाही. कारण इतिहासात मुलतान हे बौद्ध, जैन, हिंदू या सर्वच परंपरांचे पवित्र ठिकाण होते. पण इतिहासाच्या ज्ञानाअभावी ते आपल्या द्वेषाला कारण ठरते.

शाहू महाराज म्हणाले, डॉ. बाळकृष्ण यांनी शिवाजी महाराजांचे विविध संदर्भसाधनांचा वापर करून पहिलेच विस्तृत चरित्र साकारले. महाराजांना 'शिवाजी द ग्रेट' असे संबोधून जगज्जेता अलेक्झांडरच्या तोडीचे त्यांचे कार्य असल्याचे प्रथमच निदर्शनास आणून दिले.

प्रास्ताविकात डॉ. जयसिंगराव पवार यांनी, डॉ. बाळकृष्ण यांनी शिवछत्रपतींचे मराठा आरमाराचे जनक, हिंदी राष्ट्रीयत्वाचे प्रेरणास्थान आणि भारतीय स्वातंत्र्याचा ध्रुवतारा असे अनेक दुर्लक्षित पैलू जनमानसासमोर आणल्याचे सांगितले. इंग्लिश, फ्रेंच, डच, पोर्तुगीज अशा सर्व प्रकारच्या अस्सल कागदपत्रांच्या आधारे त्यांनी महाराजांचे मोठेपण अधोरेखित केले.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी, या वर्षीपासून डॉ. बाळकृष्ण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला सुरू करण्याबरोबरच 'महान शिवाजी' हा ग्रंथ राज्यातील सर्व विद्यापीठांना विशेष दूतांकरवी पाठविण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

सूत्रसंचालन डॉ. देविकाराणी पाटील यांनी, तर आभार प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मानले. कार्यक्रमास इतिहासप्रेमी नागरिक, अभ्यासक, संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी


# ऊर्जा संवर्धन मोहीम जनआंदोलन व्हावे

## चेतनसिंग सोळंकी; भारत भ्रमण मोहिमेंतर्गत शिवाजी विद्यापीठास भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ऊर्जा संवर्धनविषयक मोहिमेला जनआंदोलनाचे स्वरूप आल्यास ते यशस्वी होण्याची अधिक खात्री आहे, असे प्रतिपादन 'सौरमानव' तथा 'सोलर गांधी' म्हणून प्रसिद्ध असलेले एनर्जी स्वराज्य फाऊंडेशनचे संस्थापक प्रा. चेतनसिंग सोळंकी यांनी केले.

प्रा. सोळंकी आयआयटी मुंबई येथे सौरविज्ञान विषयाचे प्राध्यापक असून सौर ऊर्जेच्या प्रचार व प्रसारासाठी भारत भ्रमण यात्रेसाठी बाहेर पडले आहेत. २०२० ते २०३० पर्यंत ते मोहीम राबविणार आहेत. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या सुसज्ज बसमधून त्यांनी मोहीम सुरू केली आहे. मोहिमेदरम्यान त्यांनी शनिवारी शिवाजी विद्यापीठास भेट दिली. तंत्रज्ञान अधिविभागातर्फे जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट कार्यक्रमांतर्गत त्यांचे 'हवामान बदल' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : प्रा. चेतनसिंग सोळंकी यांच्या एनर्जी स्वराज्य बससमवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. महादेव देशमुख, डॉ. एस. एन. सपली, डॉ. व्ही. एन. शिंदे.**

प्रा. सोळंकी म्हणाले, ऊर्जा संवर्धनविषयक कार्यक्रम राबविणे सरकारची जबाबदारी आहे, असे समजण्याचे कारण नाही. प्रत्येक मानव हा ऊर्जेच्या वापराला व ऱ्हासाला कारणीभूत आहे. त्यामुळे तिच्या संवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाची आहे.

यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. गिरीष कुलकर्णी, डॉ. पी. सी. भास्कर, डॉ. एम. एस. भोसले उपस्थित होते.

12 MAR 2233

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऊर्जा संवर्धन जनआंदोलन बनावे

## सौरमानव एनर्जी स्वराज्य फौंडेशनचे संस्थापक प्रा. चेतन सिंग सोळंकी यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**

**कोल्हापूर**

प्रत्येक मानव ऊर्जेच्या वापराला आणि ऱ्हासाला कारणीभूत आहे. त्यामुळे तिच्या संवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाची आहे. ऊर्जा संवर्धनविषयक मोहिमेला जनआंदोलनाचे स्वरुप आल्यासच ते यशस्वी होण्याची अधिक खात्री आहे, असे प्रतिपादन 'सौरमानव' एनर्जी स्वराज्य फौंडेशनचे संस्थापक प्रा. चेतन सिंग सोळंकी यांनी केले.

आयआयटी मुंबई येथे सौरविज्ञान विषयाचे सोळंकी प्राध्यापक असून सौर ऊर्जेच्या प्रचार व प्रसारासाठी भारतभ्रमण यात्रा करीत आहेत. सन २०२० ते २०३० पर्यंत ते ही मोहीम राबविणार आहेत. मोहीम पूर्ण होईपर्यंत घरी न परतण्याची प्रतिज्ञा त्यांनी केली आहे. सौर ऊर्जेवरील सुसज्ज बसमधून त्यांनी ही मोहीम सुरू केली आहे. मोहिमेचा ८३४ व्या दिवशी त्यांनी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट कार्यक्रमांतर्गत 'हवामान बदल'. या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थिती होती.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला सदिच्छा भेट देऊन मार्गदर्शन करताना प्रा. चेतन सिंग सोळंकी. सोबत डॉ. महादेव देशमुख, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस. एन. सपली.**

प्रा. सोळंकी म्हणाले, नागरिकांनी एकत्र येऊन सौरऊर्जेसाठी आग्रह धरला तर या मोहिमेचे जनआंदोलनात रुपांतर होईल. आधुनिकीकरणाच्या नावाखाली कोळसा, तेल आणि तेलवायू यांचा वारेमाप वापर वाढला आहे. वापरातील ऊर्जेपैकी ८५ टक्के ऊर्जा या खनिज इंधनांपासूनच निर्माण केली जाते. यामुळे वातावरणातील कार्बनचे उत्सर्जन दुपटीने वाढले आहे. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम तब्बल तीनशे वर्षे म्हणजे सुमारे दहा पिढ्यांना भोगावे लागतील. मनुष्यजीवनाच्या अस्तित्वाचा प्रश्न असल्याने आपण पुन्हा शंभर टक्के सौरऊर्जेकडे वळले पाहिजे. अन्न, पाणी आणि आपण घेत असलेला प्रत्येक श्वास ही सौर ऊर्जेची देणगी आहे. मानवजातीचे अस्तित्व कायम राखावयाचे असल्यास दोन नियमांचे पालन करावे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठ पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले आहे. भविष्यात सौरऊर्जेच्या सहाय्याने विजेचा प्रश्नही मिटेल. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, प्रत्येक श्वासागणिक निसर्गावर, नैसर्गिक साधनस्त्रोतांवर कसे अत्याचार करीत आहोत, शोषण करीत आहोत, याची जाणीव प्रा. सोळंकी यांनी करून दिली. ऊर्जासंवर्धनासाठी त्यांनी सुचविलेल्या उपाययोजना केवळ आपल्यापर्यंत सीमित न राखता गावा-गावापर्यंत, शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत घेऊन गेले पाहिजे. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी मानव्यविद्या विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. गिरीष कुलकर्णी, डॉ. पी. सी. भास्कर, डॉ. एम. एस. भोसले आदी उपस्थित होते.

12 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मानवी अस्तित्वासाठी सौरऊर्जेकडे वळा : प्रा. चेतनसिंग सोळंकी

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : "मनुष्यजीवनाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्याने मानवाने पुन्हा शंभर टक्के सौरउर्जेकडे वळायला हवे," असे प्रतिपादन 'सौरमानव' तथा 'सोलर गांधी' म्हणून प्रसिद्ध असलेले एनर्जी स्वराज्य फाउंडेशनचे संस्थापक प्रा. चेतनसिंग सोळंकी यांनी आज येथे केले. ऊर्जा संवर्धनविषयक मोहीम जनआंदोलनाद्वारे यशस्वी होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट कार्यक्रमांतर्गत आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'हवामान बदल' विषयावर त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. शाहू सभागृहात व्याख्यान झाले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात प्रा. चेतनसिंग सोळंकी यांनी मार्गदर्शन केले..**

प्रा. सोळंकी म्हणाले, "ऊर्जा संवर्धनविषयक कार्यक्रम राबविणे, ही केवळ सरकारची जबाबदारी आहे, असे समजण्याचे कारण नाही. प्रत्येक मानव उर्जेच्या वापराला आणि ऱ्हासाला तितकाच कारणीभूत आहे. त्यामुळे तिच्या संवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाची आहे. प्रत्येक जागरूक नागरिक एकत्र येऊन सौरऊर्जेसाठी आग्रही बनेल, तेव्हा त्या मोहिमेचे जनआंदोलनात रूपांतर होईल. ही इच्छाशक्ती निर्माण होणे, हीच आजची खरी गरज आहे."

ते म्हणाले, "आधुनिकीकरणाच्या नावाखाली कोळसा, तेल व तेलवायू यांचा वारेमाप वापर सुरू आहे. आज आपण वापरत असलेल्या उर्जेपैकी ८५ टक्के ऊर्जा खनिज इंधनांपासूनच निर्माण केली जाते. त्यामुळे वातावरणातील कार्बनचे उत्सर्जन दुपटीने वाढले आहे. यामुळे हरितगृह-वायू परिणाम होऊन तापमान वातावरणाच्या कक्षेत पकडून ठेवले जाते. या ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम एक-दोन नव्हे, तर तीनशे वर्षे म्हणजे दहा पिढ्यांना भोगावे लागतील."

या वेळी मानव्यविद्या विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. पी. सी. भास्कर, डॉ. एम. एस. भोसले उपस्थित होते.

### प्रा. सोळंकींची सौरउर्जेच्या प्रसारासाठी प्रतिज्ञा

■ प्रा. सोळंकी आयआयटी मुंबई येथे सौरविज्ञान विषयाचे प्राध्यापक असून, सौरउर्जेच्या प्रचार व प्रसारासाठी भारतभ्रमण यात्रेसाठी बाहेर पडले आहेत. ते २०२० ते २०३० पर्यंत ही मोहीम राबविणार असून, तोपर्यंत कोणत्याही कारणाने घरी न परतण्याची प्रतिज्ञा त्यांनी केली आहे. संपूर्ण सौरउर्जेवर चालणाऱ्या सुसज्ज बसमधून त्यांनी मोहीम चालवली आहे. आज त्यांच्या मोहिमेचा ८३४ वा दिवस. मोहिमेदरम्यान त्यांनी विद्यापीठास आज भेट दिली.

### ...तर भयावह दुष्परिणाम

१८८० ते १९२० या कालावधीच्या तुलनेत आज पृथ्वीचे तापमान १.१९ अंश सेल्सिअसने वाढले आहे. अवघ्या सहा वर्षे ११३ दिवसांच्या कालावधीत ते १.५ अंश सेल्सिअसपर्यंत जाणार आहे. त्यापुढे ते दोन टक्क्यांपर्यंत जर गेले, तर त्याचे भयावह दुष्परिणाम संभवतात. त्यानंतर आपण काहीही केले तरी आपले जीवन पूर्ववत करू शकणार नाही. त्या दृष्टीने २ अंश सेल्सिअस तापमान म्हणजे मानवजातीच्या अस्तित्वाच्या रक्षणासाठीची लक्ष्मणरेखा आहे. याच गतीने प्रदूषण करत राहिलो तर २१०० पर्यंत पृथ्वीचे तापमान २.८ ते ६ अंश सेल्सिअसने वाढेल, असा इशारा सोळंकी यांनी दिला.

12 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## डॉ. पवार यांचे 'आजीवन' शिक्षण; सहा जणांना पीएच.डी.चे मार्गदर्शन

# सात पदव्युत्तर पदव्या अन् तीन पेटंट!

**संदीप खांडेकर :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : पदवी अथवा पदव्युत्तर शिक्षणानंतर नोकरी लागली की, शिकायचे कशाला? असा प्रश्न मनात येणे साहजिक आहे. शिकण्याची भूक असेल तर मात्र गोष्ट निराळीच म्हणावी लागेल. एखाद्याने दोन पदव्या घेतल्या असतील, पीएच. डी. मिळवली असेल व एक-दोन नव्हे तब्बल सात विषयांत पदव्युत्तर पदव्या घेतल्या असतील तर भुवया उंचावल्याशिवाय राहणार नाहीत. त्यातही त्या व्यक्तीच्या नावे तीन पेटंट असतील, तर त्या व्यक्तिविषयीची उत्सुकता



**डॉ. रामचंद्र पवार**

वाढल्याखेरीज राहणार नाही. शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या संचालकांनी ही किमया साधली आहे. विभागाच्या संचालक पदावर कार्यरत असणारी ही व्यक्ती म्हणजे डॉ. रामचंद्र गोविंद पवार.

कोणी किती पदव्या घ्याव्यात

> शालेय जीवनात मला इंग्रजीची भीती होती. ती मी दूर केली. पुढे इंग्रजी विषयात पदव्युत्तर पदवी मिळवली. काही अभ्यासक्रम हौस, तर काही आव्हान म्हणून मी स्वीकारले. केवळ कथा, कादंबऱ्या वाचून उपयोग नाही. त्याचे पेपर क्वॉलिफिकेशन मिळावे, यासाठी मी पदव्युत्तर पदव्या मिळवल्या आहेत.
>
> **- डॉ. रामचंद्र पवार,** संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ

अथवा पदव्युत्तर पदव्या घ्याव्यात, याला नियमांची चौकट नाही. नोकरी लागली की, करिअरची भाषा संपते अन् आयुष्याचा पुढचा प्रवास सुरू होतो. डॉ. पवार यांची कहाणी मात्र वेगळी आहे. ते मूळचे सातारा जिल्ह्यातील मांडव्याचे. वडील प्राथमिक शिक्षक, तर आई बकुळा गृहिणी. मुलाने उच्च शिक्षित व्हावे, ही त्यांची इच्छा. पवार यांनी दोन पावले पुढे टाकत शिक्षण प्रवास सुरू केला. अनंत इंग्लिश स्कूलमधून दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधून बीएस्सीपर्यंत (फिजिक्स) शिक्षण घेतले. त्यानंतर एमसीए (इंजिनियरिंग), एलएल.बी. (स्पेशल), डिप्लोमा इन सायबर लॉचा अभ्यासक्रम पूर्ण केला.

पुढे पीएच.डी मिळवून एमपीए (एमबीए एचआर), एम. ए. (इकॉनॉमिक्स), एम. कॉम. (बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन), एम. ए. (इंग्रजी), एम. ए. (इतिहास), एम. ए. इन पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये (इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी) पदव्युत्तर पदव्या मिळवल्या. विशेष म्हणजे एम. ए. (राज्यशास्त्र) विषयाची परीक्षा त्यांनी दिली असून, त्याचा निकाल लागणे बाकी आहे. इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटीमध्ये त्यांनी शिक्षणशास्त्र विषयासाठी प्रवेश घेतला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. मिळवली असून, सध्या तीन विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करत आहेत. त्यांच्या नावे तीन पेटंट आहेत. त्यांनी चार पुस्तकांचे लेखन केले आहे.

लोकमत

# यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त चर्चासत्र

कोल्हापूर : महाराष्ट्राचे आद्य शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त 'यशवंतराव चव्हाण आणि स्थानिक स्वराज्य संस्था' या विषयावर १४ मार्चला सकाळी ११ वाजता अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये एकदिवसीय चर्चासत्र होणार आहे. जिल्हा परिषदेचे माजी अधिकारी इंद्रजित देशमुख, समीर देशपांडे आणि शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती प्रमुख वक्ते आहेत. यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटमार्फत हे चर्चासत्र होत आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात बुधवारपासून 'राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषद'

## शाहू संशोधन केंद्राचे आयोजन : मुणगेकर, भवाळकर यांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजर्षी शाहू स्मृती शताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्र आणि इतिहास अधिविभाग यांच्यातर्फे बुधवार, दि. १५ आणि गुरुवार, दि. १६ मार्च रोजी 'राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेचे' आयोजन केले आहे. या परिषदेला उद्‌घाटक आणि प्रमुख पाहुणे म्हणून शाहू महाराज उपस्थित राहणार आहेत. अर्थतज्ज्ञ, विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे बीजभाषण होणार आहे. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असतील..

१५ मार्चला सकाळी १०:३० ते १२:३० या वेळेत डॉ. भालचंद्र मुणगेकर 'राजर्षी शाहूंचे अर्थकारण आणि त्याची विद्यमान प्रासंगिकता' या विषयावर बीजभाषण करणार आहेत. सकाळी १२:४५ ते २:०० या वेळेत डॉ. यशवंतराव थोरात 'राजर्षी शाहू आणि युरोपियन विचार-विश्व', दुपारी ३:०० ते ५:३० या वेळेत डॉ. तारा भवाळकर 'राजर्षी शाहू आणि त्यांची स्त्रीविषयक भविष्यवेधी दृष्टी', डॉ. सदानंद मोरे 'राजर्षी शाहू आणि महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरा' या विषयावर बोलणार आहेत.

१६ मार्चला प्राचार्य आनंद मेणसे 'राजर्षी शाहू आणि सामाजिक न्याय' आणि डॉ. अशोक चौसाळकर 'राजर्षी शाहू आणि ब्राह्मणेतर चळवळ', दुपारी ३:०० ते ०५:३० या वेळेत लक्ष्मीकांत देशमुख 'राजर्षी शाहू आणि भारतीय संविधान' या विषयावर बोलणार आहेत.

लोकमत

# स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान मोलाचे : भोसले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान मोलाचे आहे, असे मत डॉ. अरुण भोसले यांनी व्यक्त केले.

भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि विद्यापीठाच्या शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे 'भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामधील पश्चिम महाराष्ट्रातील ज्ञात-अज्ञात नायक' या विषयावर चर्चासत्र झाले. त्याचे उद्घाटन मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. समन्वयिका डॉ. निलांबरी जगताप यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. अरुण भोसले यांनी पश्चिम महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीतील घटनांवर प्रकाश टाकला. या चर्चासत्राचे प्रमुख पाहुणे भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेचे सदस्य सचिव प्रा. डॉ. उमेश कदम यांनी दे उपक्रमांची माहिती दिली. दुपारच्या सत्रात डॉ. विलास पोवार, प्राचार्य डॉ. अंकुश बेलवटकर, डॉ. अजितकुमार जाधव यांनी मांडणी केली.

पुढारी

# विद्यापीठात १५ पासून राजर्षी शाहू परिषद

कोल्हापूर : राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ शाहू संशोधन केंद्र व इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ व १६ मार्च रोजी राजर्षी शाहू स्मृतिशताब्दी परिषदेचे आयोजन केले आहे. परिषदेचे उद्‌घाटन शाहू महाराज यांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर बीजभाषण करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. परिषदेमध्ये डॉ. यशवंतराव थोरात, डॉ. सदानंद मोरे, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. तारा भवाळकर, लक्ष्मीकांत देशमुख, प्राचार्य आनंद मेणसे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. शाहूप्रेमींनी परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन शाहू संशोधन केंद्राचे समन्वयक, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले आहे.